NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना संकट व भारत

**प्रा.डॉ.संतोष शिवकुमार खत्री**,
राज्यशास्त्र विभाग,विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे
**संदिप जगन्नाथ वारूळे**,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गारखेडे तालुका : येवला जिल्हा : नाशिक

..............................................................................................................

**प्रस्तावना :**

आज जगातील सर्वच देशांना, शास्त्रज्ञांना, अर्थतज्ञांना, तत्त्वचिंतकांना, राजकीय विश्लेषकांना, एवढेच काय तर धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक क्षेत्रांना. ज्या यक्ष प्रश्नाने घेरलेले आहे. अर्थातच कोरोना होय. "कोरोना यास कोविड 19 असे म्हटले जाते." [१] चीन देशातील वुहान शहरात निर्माण झालेल्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने जगात फारच हाहाकार घातलेला आहे. कोविड दृ १६ च्या उत्पाताने जगातील सर्वच महासत्ता हतबल झालेल्या आहे. विविध राष्ट्रात रोज कोरोनाची लागण झालेले रुग्ण व त्याने होणारे मृत्यू यांचे प्रमाण गुणाकार पटीने वाढत चालेले आहे. इटली, फ्रांस, अमेरिका, जपान या सारखे जगातील प्रगत देश देशोधडीला लागण्याची चिन्ह निर्माण झालेली आहे. "जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावास 'महामारी' म्हणून घोषित केलेले आहे." [२] जगासमोर महामारी च्या संकटा बरोबर आर्थिक महामंदीच्या संकटाने आपले तोंड काढायला सुरुवात केलेली आहे.

कोरोनाच्या महामारीत ज्यांच्याकडे वैद्यकीय सुविधा विपुल व अद्यावत आहे. असे प्रगत देश कोरोनाच्या विषाणूने होरपळून निघाले आहे. याउलट भारत देशात तर सुसज्ज वैद्यकीय साधनांची कमतरता व लोकसंख्या प्रमाणात दवाखान्यांची उपलब्धता. याबाबी चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत भारत आपला किती निभाव लावेल ? पण अशा विपरीत परिस्थितीतही भारताने कोरोनाशी चालविलेला लढा व जगात सिद्ध केलेले आपले प्रभुत्व. याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषय आहे.

**गृहीतकृत्य** :

१. कोरोना हे महाभयंकर संकट आहे.
२. भारताने कोरोना विरुद्ध लढा उभारला आहे.
३. भारताने कोरोना संकटकाळात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभुत्व सिद्ध केले आहे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत संशोधन विषयासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच माहिती संकलनासाठी वर्तमान पत्र , आंतरजाळ यांचा आधार घेतलेला आहे.

**विषय विवेचन :**

कोरोना संकट व भारत यांचा अभ्यास करता कोविड दृ १६ चा प्रादुर्भाव भारतात अंदाजे ३१ जानेवारी २०२० झाला. जो इतर देशाच्या मानाने लवकर होता. पण भारतात कोरोनाच्या आजाराने केलेला शिरकाव, त्यानंतरची स्थिती व त्याबाबत केलेल्या उपाय योजना. याबाबत बघितले तर इतर देशाच्या मानाने फारच समाधानकारक चित्र दिसते.

**१. कोरोना महाभयंकर संकट** :

कोरोना हे २० व्या शतकात आलेले महाभयंकर संकट म्हणावे लागेल. कोरोच्या प्रादुर्भावाने सर्वच क्षेत्र प्रभावित झाले दिसतात. कोरोना मुळे जगातील क्रयशक्ती शांत बसलेली जाणवते. तसेच मोठ्या प्रमाणात जीवितहानी होत आहे. कोविड १६ च्या संसर्गाने शेती व्यवसाय, उद्योगधंदे, शासकीय व खाजगी कार्यालय, शैक्षणिक संस्था, यासारखे अनेक विभाग हतबल झालेले आहे .

देशांर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहार ठप्प झालेले आहे. कोविड १६ च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होत आहे. यात भारत देशाची भूमिका महत्वपूर्ण स्वरुपाची ठरत असल्याचे जाणवते.

**२. भारत महानांची भूमी** :

भारत देश मुळातच संत, ऋषी व अवतार यांची जन्म व कर्मभूमी आहे. या महाजनांनी केलेले कार्य, रुजविलेले संस्कार, दिलेले शिक्षण भारतीयांत एक आंतरिक सामर्थ्य उभे करीत असते. कारण

''शरिर माद्दं खलु धर्म साधनम'' (३) अर्थातच मानवात असलेली शारिरीक प्रतिकार शक्ती कोणत्याही संकटात लढण्याचे सामर्थ्य देत असते. तसेच भारतात केला जाणारा शाकाहार, योगासने, निसर्गाशी जवळीकता, अध्यात्म याचा परीणाम असा की, कोरोना सारखा आजार जरी भारतात धुमाकूळ घालत असेल. पण त्याच्या वाढीचा वेग गुणाकाराच्या पटीत नसल्याचे जाणवते.

**३. शासन व प्रशासन स्तरावरील उपाययोजना :**

भारत देशातील शासन व प्रशासन यांनी कोविड 19 च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेली उपाय योजना व घेतलेली खबरदारी ही तितकीच उल्लखनीय बाब म्हणावी लागेल. भारत सरकारने व प्रत्येक घटक राज्यांनी कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी जे कठोर निर्णय घेतले. त्याचे कौतुक जगाने सुद्धा केल्याचे जाणवते. यात लॉकडाऊनने तर फारच परिणामकारक परीणाम केल्याचे दिसते. आज पर्यंत अनेक संकट आली, आजार आले. पण एवढी कडक उपाययोजना कधीच झाल्याचे जाणवत नाही "प्रशासनातील अत्यावश्यक सेवा पुरविणारे घटक आपला जीव धोक्यात घालून कोरोनाच्या लढयात मोठ्या ताकदीने काम करत आहे. या लोकांना बळ देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ मार्च रोजी ५ मिनिट टाळ्या, थाळी, घंटा वाजविण्या बद्दल जनतेस आवाहन केले होते. ज्यास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता." (४)

**४. एकतेची जूट :**

कोरोनाच्या संकटामुळे जरी विपरीत परीणाम झाला असेल. पण यामुळे काही लाभदायक बाबी घडत असल्याचे जाणवते. या महामारीच्या काळात संपूर्ण देशात ऐक्य भाव प्रखरतेने पहावयास मिळाला. या काळात पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांनी जेंव्हा जेंव्हा जनतेस आव्हान केले. त्या प्रत्येक आव्हानास देशातील व राज्यातील नागरिकांनी राजकीय, धार्मिक, जातीय, प्रांतीय असा कुठलाच भेदभाव अथवा दुरावा न ठेवता प्रतिसाद दिला. या महामारीच्या काळात प्रत्येक देशवासीय सरकारच्या बाजूने उभा राहिल्याचे जाणवते. "पंतप्रधान यांनी २२ मार्च रोजी जनता कर्फ्यू पाळणे बाबत आव्हान केले होते."[5] त्यास कुठ्लाच विरोध, प्रतिकार, टीका, व्देष याचा लवलेश नबाळगता सर्वच देशवासीयांनी प्रतिसाद दिला. "तसेच 5 एप्रिल रोजी रात्री 9.०० वा.घरातील लाईट बंद करून दिवे प्रकाशित करणेबाबत जे आव्हान केले होते."[6] यासाठी भारतीय नागरिकांनी दिवे, मेणबत्ती पेटवून उत्तम सहभाग नोंदविला. अर्थातच संपूर्ण देश एकजुटीने कोविड 19 ला हद्दपार करण्यासाठी लढत आहे. हे चित्र राष्ट्रहितास लाभदायक स्वरूपाचे आहे.

**५. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रभूत्व :**

कोरोना हे महाभयंकर संकट असून यात देशातील सर्वच घटकांवर विपरीत परिणाम झाला आहे. तरी या काळात भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली एक नवीन ओळख प्रस्थापित केलेली आहे. जगातील इतर देशांनी "कोरोनासाठी जागतिक स्तरावर स्थापन झालेल्या समितीचे अध्यक्ष भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केले."[7] "भारताने कोरोना संकट काळात अमेरिका, ब्राझील या देशाना कोरोनासाठी उपयुक्त असे हायड्रोक्सिक्लोरोक्विन पुरवून संकट काळात मैत्रीची जुनी परंपरा जपली. यामुळेच ब्राझीलचे राष्ट्रपती बोल्सोनारो यांनी भारताचे पंतप्रधान यांची तुलना बजरंगबली यांच्याशी केली आहे." [8] ह्याबाबी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रभुत्व सिद्ध करत आहे.

**६. उदासीनता :**

भारत सरकार व प्रत्येक घटक राज्यशासन कोरोना संकटाला हद्दपार करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करीत आहे. पण या प्रयत्नाला काही जणांकडून छेद घातला जात आहे. यात लॉकडाऊनचे नियम मोडणे, कोरोना लक्षण असतांना इतरांच्या संपर्कात जाणे, कोरोना आजाराचे लक्षण लपविणे, कोरोनाबाबत अफवा पसरविणे, आरोग्याच्या बाबतीत काळजी न घेणे. नागरिकांतील ही उदासीनता जे कोरोनाला हद्दपार करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यांचा हा अपमानच आहे. याबाबी चिंताजनक स्वरूपाच्या आहे.

**निष्कर्ष :**

कोविड 19 च्या संकटाने जगाला हेलावून सोडले आहे. या महामारीला रोखण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना युद्ध पातळीवर काम करत आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक राष्ट्रातील वैदयकीय क्षेत्रातील संशोधक दिवस – रात्र परिश्रम करून लस शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. या संकटाला

काही तज्ज्ञ जैविक युद्ध म्हणून ही संबोधत आहे. कोरोनाच्या महामारीने सर्वच क्षेत्रातील व्यवस्था कोलमडून पाडल्या आहे. जगात चाललेली धावपळ कधी थांबेल का ? असा प्रश्न सर्वांना पडला होता. पण या प्रश्नाचे उत्तर अगदी ४०० ते ५०० माइक्रोमीटरच्या विषाणूने दिले आहे.

कोरोना विरुद्धच्या लढ्यात भारताने दाखविलेले आंतरिक सामर्थ्य, शासन स्तरावरील उपाययोजना, नागरीकातील एकजूट, जागतिक स्तरावर दाखविलेले औद्यार्य ह्या बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहे. जगाने भारताकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. पाश्चात्य राष्ट्रांनी भारतातील आदर्शवत जीवन पद्धतीचा अंगीकार करायला हवा. स्वरू हिताचा विचार न करता दुस—याचा विचार करायला शिकले पाहिजे. आज देशा – देशात ज्या जीवघेण्या सत्ता स्पर्धा चालेल्या आहेत. त्या थांबून नैतिकता जोपासली पाहिजे. तसेच भारतीयांनी सुध्दा पाश्चिमात्यांचे अनुकरण न करता आपला प्राचीन वारसा व संस्कार जोपासले पाहिजे. तरच भविष्यातील जीवन आनंदी व निरोगमयी राहील.

**संदर्भ**

१. लोकमत दैनिक वर्तमान पत्र ( वेब आवृत्ती ) दि.२५.०३.२०२०, वेळ रात्री 8.28 वा.
2 www-amp/marathi-abplive-com] Date & 29/03/2020] Time & 10-35 am
3 www-indianspiritual-in/veda&shloka&about&life&in&hindi-35621-htm] Date – 29/04/2020] Time – 10-57 am
४. पुढारी दैनिक वर्तमान पत्र ( वेब आवृत्ती ) दि.२२.०३.२०२०, वेळ दृ सायं 6.28 वा.
5. www-financial EÛpress-com] Date – 29/04/2020] Time – 11-49 am
6 www-esakal-com] Date& 28/04/2020] Time – 11-07 am
7 www-lokmat-news 18-com ] Date& 28/04/2020 ] Time & 6-11 pm
8. लोकमत दैनिक वर्तमान पत्र ( वेब आवृत्ती ) दि.08.04.2020, वेळ दृ दुपारी 2 .19 वा.